| Publication: Saamana | Page No - 5 |
|---|---|
| Edition: Print | Date: August 17, 2023 |

# एसईओवाय इंडिया अ‍ॅवॉर्ड

मुंबई : श्वाब फाऊंडेशन फॉर सोशल आंत्रप्रेन्युअरशिपतर्फे ज्युबिलंट भारतीया फाऊंडेशनच्या (एसईओवाय) भागीदारीने सोशल 'आंत्रप्रेन्युअरशिप ऑफ द इअर इंडिया अ‍ॅवॉर्ड २०२३' या पुरस्कारांच्या १४ व्या आवृत्तीच्या अंतिम फेरीत पोहोचलेल्या सहभागींची घोषणा करण्यात आली. या मानाच्या पुरस्काराच्या माध्यमातून सोशल इनोव्हेटर्सनी असामान्य सामाजिक-व्यावसायिक उपक्रमांच्या माध्यमातून लोकांच्या आयुष्यात सकारात्मक परिवर्तन घडवण्यासाठी दिलेल्या अतुलनीय योगदानाची दखल घेण्यात येते आणि त्यांचा सन्मान करण्यात येतो. २५ ऑगस्टला नवी दिल्लीमध्ये आयोजित एका भव्य समारंभात या पुरस्कार विजेत्याचे नाव जाहीर करण्यात येणार आहे.